# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १० ऑगस्ट, २०१७ / श्रावण १९, १९३९ ( शके )**

**(१) आदिवासी विकास मंत्री**
**(२) उद्योग व खनिकर्म मंत्री**
**(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**
**(४) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**
**(५) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २८**

---

### कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणेबाबत

**(१) * ३४३५२ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना सर्वस्वी दलालावर अवलंबून रहावे लागत असल्यामुळे आंब्याला योग्य भाव मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंब्याला हमी भाव देणे तसेच राष्ट्रीय पातळीवर बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) नाही. कृषी मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषी पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीचा अभिनव उपक्रम राबविण्यात येतो व याअंतर्गत पणन मंडळामार्फत दरवर्षी आंबा महोत्सवांचे आयोजन केले जाते. सदर योजनेस ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून ग्राहकांना उत्तम प्रतीचा नैसर्गिकरित्या पिकविलेला आंबा रास्त दरात उपलब्ध होत आहे तसेच आंबा निर्यात युरोप, अमेरिका, न्यूझिलंड, मॉरीशस, ऑस्ट्रेलिया, जपान, दक्षिण कोरिया, इ. देशांत करण्यात येत आहे.

आंबा हा नाशवंत शेतमाल असल्यामुळे आंब्याबाबत केंद्र शासनाकडून हमीभाव घोषित केला जात नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील आदिवासी मुलींचे वसतिगृह बंद करण्यात आल्याबाबत

**(२) * ३२४९६ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील कॅम्प नं. ४ परिसरातील भाड्याच्या इमारतीत आदिवासी विद्यार्थीनीचे वसतिगृह असून त्यामध्ये राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहून आलेल्या सुमारे ६० विद्यार्थिनी रहात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारत रिक्त करण्याचे आदेश आदिवासी विकास विभागाच्या आयुक्तांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर विद्यार्थिनींच्या राहण्यासाठी शासनाकडून नवीन वसतिगृहाची व्यवस्था करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

सदर वसतिगृह इमारतीचे भाडे जास्तीचे असल्याने सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून कमी भाडे असलेल्या इतर पर्यायी इमारतीमध्ये वसतिगृह स्थानांतरीत करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास यांनी अपर आयुक्त, ठाणे तसेच प्रकल्प अधिकारी, शहापूर यांना कळविले होते, तथापि, वसतिगृह रिक्त करण्याचे आदेश दिले नव्हते.

तथापि, प्रकल्प अधिकारी, शहापूर यांना आवश्यक सुविधायुक्त पर्यायी इमारत उपलब्ध न झाल्याने सद्य:स्थितीत सदर वसतिगृह पूर्वीच्याच इमारतीत कार्यरत आहे. तसेच सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी वसतिगृह प्रवेशाची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील विद्यार्थ्यींनी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(३) * ३४०३४ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक २७२४६ ला दिनांक २१ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या ३५०० विद्यार्थ्यींनी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिष्यवृत्तीपासून वंचित असलेल्या विद्यार्थीनीचे प्रलंबित अर्ज प्राधान्याने निकाली काढून त्या विद्यार्थ्यींना योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) सदरहू योजनेंतर्गत दिनांक २८ डिसेंबर, २०१६ पर्यंत प्रलंबित असलेले अर्ज सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात निकाली काढण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील अस्थायी कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत

**(४) * ३११९० ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून नियोजनानुसार टप्प्याटप्प्याने औद्योगिक क्षेत्रे विकसित करण्यात येत असून त्यासाठी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करुन ती चालविण्यासाठी तसेच औद्योगिक क्षेत्रात मुलभूत सेवा सुविधा पुरविण्यासाठी अभियांत्रिकी व दरसूचीवरील प्रतिदिन दरानुसार दरमहा पध्दतीने अथवा मासिक वेतन पध्दतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अखंड सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम आस्थापनेवर अथवा रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवर घेण्याबाबतची मागणी कंत्राटी/अस्थायी कर्मचाऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांची नियुक्ती सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीने व कामाच्या आवश्यकतेनुसार करण्यात येऊन त्यांना वेतन व काही सवलती/भत्ते देवून अंशत: रुपांतरीत पध्दत तयार करुन ती कार्यान्वित करणे योग्य असल्याचे मत महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्यासभेत विभागाने नोंदविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) होय, अंशत: खरे आहे.

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक १०/२/२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिनांक १०/५/२००६ पूर्वी सेवेत कार्यरत असलेल्या कंत्राटी, दरसूची, जॉब बेसीस वरील व्यक्तींना महामंडळामध्ये अंशत: रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवर सामावून घेण्याबाबतचा मसुदा सादर करण्यात आला.

(४) उक्त ठरावाच्या अनुषंगाने दिनांक १०/०५/२००६ पूर्वी सेवेत कार्यरत असलेल्या कंत्राटी, दरसूची, जॉब बेसीसवरील व्यक्तींची कार्यरत असलेल्याबाबतचे कागदपत्रे/पुरावे यांची छाननी करण्यात येत आहे. सदर व्यक्तींपैकी काहीं व्यक्तींनी सेवेत कायम करण्यासाठी विविध न्यायालयात दावे दाखल केलेले आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाचे तसेच शासनाचे निर्बंध याबाबी तपासून दिनांक १०/०५/२००६ पूर्वी सेवेत कार्यरत असलेल्या कंत्राटी, दरसूची, जॉब बेसीसवरील व्यक्तींना महामंडळामध्ये अंशत: रुपांतरीत व स्थायी आस्थापनेवर सामावून घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राष्ट्रीय महामार्गावरील मद्य विक्रीमुळे अपघातात वाढ होत असल्याबाबत

**(५) * ३१४९९ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील किती परवानाधारक मद्य विक्री दुकाने बंद करण्यात आली आहेत,

(२) असल्यास, मुंबईहून लातूरकडे जाणाऱ्या ट्रॅव्हल्सच्या मद्यधुंद अवस्थेतील बस चालकाचा बसवरील ताबा सुटून बीड जिल्ह्यातील धानोरा गावाजवळ झालेल्या अपघातात ९ प्रवाशांचा मृत्यू झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील दारू दुकानांच्या अंतर मोजमापात दिरंगाई होत असून नियमबाहय मद्य विक्री दुकाने सुरु असल्याने अपघातांच्या संख्येत वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नियमबाह्यरित्या सुरु असलेली मद्य विक्री दुकाने बंद करणे तसेच उपरोक्त अपघाताची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

किरकोळ मद्य विक्रीची अंदाजित १५०३३ मद्य विक्री दुकाने बंद करण्यात आली आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अंतरनिर्बंधात येणाऱ्या मद्य विक्री अनुज्ञप्त्यां बंद करण्यात आल्या आहेत.

उपरोक्त अपघाताबाबत पो.स्टे. अंभोरा येथे ५ आरोपींविरुध्द कलम ३०४, ३०४अ, २७९, ३३७, ३३८, ४२७ भा.दं.वि. सह कलम १८४, १३४, ६६ (१)/१९२ मोटार वाहन कायदा अन्वये गु.र.नं. १६२/२०१७ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील सभागृहांचा गोडावून म्हणून वापर होत असल्याबाबत

**(६) * ३३१७४ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील दोन सभागृहांचा गोडावून म्हणून वापर होत असल्याचे माहे मे, २०१७ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्मारकाच्या देखभालीसाठी निधी उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) महाड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील दोन कक्ष सहा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी EVM मशीनच्या Strong Room करीता अधिग्रहित केले आहेत.

(२) नाही.

(३) वर नमूद केलेले कक्ष रिकामे करण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुटीबोरी (जि.नागपूर) औद्योगिक वसाहतीतील प्रकल्पांनी माघार घेतल्याबाबत

**(७) * ३२१२२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक वसाहतीतील 'मेक इन इंडिया' च्या करारानुसार रुपये १६४० कोटींची गुंतवणूक असलेल्या अनेक प्रकल्पांनी माघार घेतल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त उद्योगांनी सदर प्रकल्पांतून माघार घेण्याची कारणे काय आहेत तसेच या प्रकल्पांमुळे विदर्भातील तरूणांना मोठया प्रमाणात रोजगार मिळणार असल्याने सदर औद्योगिक वसाहतीत जास्तीत जास्त उद्योगांनी गुंतवणूक करण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

(२) मेक इन इंडिया फेब्रुवारी, २०१६ अंतर्गत बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत २७ प्रकल्पांनी सामंजस्य करार केलेले आहेत. यातील प्रस्तावित गुंतवणुक रु.११४१.२६ कोटी आहे व ३९६४ रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. सदर २७ प्रकल्पांपैकी १२ उद्योग घटक प्रत्यक्ष उत्पादनात गेले असून त्यातील गुंतवणुक रुपये ५८६.७६ कोटी व रोजगार ३२८० इतका आहे.

बुटीबोरी औदयोगिक वसाहतीतील कोणत्याही घटकाने माघार घेतली असल्याबाबतचे प्रकरण निदर्शनास आलेले नाही.

राज्यात विदर्भ क्षेत्रात उद्योग स्थापन व्हावेत व त्याव्दारे रोजगार निर्मिती होण्याकरीता सामुहिक प्रोत्साहन योजनाव्दारे नागपूर व अमरावती विभागातील तालुका वर्गीकरणानुसार वाढीव प्रोत्साहने देय केली आहेत. विदर्भ, मराठवाडा व राज्यातील अन्य औद्योगिकदृष्टया मागास भागात उद्योग स्थापनेसाठी विविध प्रोत्साहने देवून राज्य शासन सदर भागात उद्योग उभारणीसाठी प्रयत्नशील आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड येथील मतिमंद शाळेतील महिला कर्मचाऱ्याच्या थकीत वेतनाबाबत

**(८) * ३३२४९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथील अनिवासी मतिमंद शाळेतील सफाई कामगार पदावर कार्यरत महिला कर्मचाऱ्याने थकीत वेतनासाठी समाजकल्याण विभागाला माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन देवून मृत्यूची परवानगी मागितली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलेने मृत्यूची परवानगी मागण्यापूर्वी थकीत वेतनासाठी आत्मदहनाचाही प्रयत्न केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महिला कर्मचाऱ्याचे थकीत वेतन अदा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, असे निवेदन जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाले आहे.
(२) होय.
(३) थकीत वेतन अदा केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयात दिल्ली-मुंबई कॉरिडोर प्रकल्पासाठी सक्तीने भूसंपादन करीत असल्याबाबत

**(९) * ३१०५७ श्री.नारायण राणे : तारांकित प्रश्न क्रमांक ३०६१७ ला दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील प्रस्तावित दिल्ली-मुंबई कॉरिडोर प्रकल्पासाठी वाटाघाटीतून भूसंपादन करण्याचे प्रयत्न असफल झाल्यामुळे शासन शेतकऱ्यांकडून सक्तीने भूसंपादनाची परवानगी घेत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांचे पुनर्वसन व योग्यरितीने जमीन संपादन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर रोहा-माणगांव व पाणसई औद्योगिक क्षेत्रातील पहिल्या टप्प्यातील १० गावांचे भूसंपादनाची कार्यवाही उपजिल्हाधिकारी भूसंपादन, काळ प्रकल्प २ माणगांव व उपविभागीय अधिकारी, माणगांव यांच्यामार्फत सुरु असून, त्यामधील ८२% जमिनीचा ताबा संमतीने प्राप्त झाला आहे. ताबा प्राप्त क्षेत्राच्या लगत असलेल्या सर्व्हे नंबरची संमती बाकी असून, अशा क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील कलम ३३ (३) अन्वये भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम ३३(३) नुसार भूसंपादनाची कार्यवाही सुरु असून गावठाणाचा भूसंपादनात समावेश नाही व जास्तीत जास्त संमतीने जमीन संपादीत करण्यात येत असल्याने पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्णा (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप करण्याबाबत

**(१०) * ३४२७० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्णा (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील ४६५ शेतकऱ्यांचे दुष्काळी अनुदान जिल्हा मध्यवर्ती बँकेस सहा महिन्यापासून प्राप्त होऊनही वाटप झाले नसल्याचे माहे जून, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खात्यात पैसे असूनही मिळत नसल्याने याबाबत शेतकऱ्यांनी तहसिलदार जिंतूर यांचेकडे लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी दिलेल्या लेखी निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) तहसिलदार जिंतुर यांनी दिनांक ०३/०७/२०१७ रोजी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा बोरी, ता.जिंतुर, जि.परभणी यांना त्वरीत अनुदान वाटप करुन अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे. सद्य:स्थितीत वर्णा गावासाठी ४६५ सभासदांसाठी रूपये १३.३७ लाख दुष्काळी अनुदान प्राप्त झाले आहे. यापैकी ४२९ सभासदांचे रूपये ११.६२ लाख अनुदान बचत खात्यात जमा करण्यात आले असून ३६ सभासदांचे रूपये १.७५ लाख अनुदान जमा करणे बाकी आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गंगाखेड शुगर ॲन्ड एनर्जी लि. (जि.परभणी) कारखान्यांच्या संचालकांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(११) * ३४३७४ श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड शुगर ॲन्ड एनर्जी लि. (जि.परभणी) कारखान्यांच्या संचालक मंडळाने जिल्हयातील हजारो शेतकऱ्यांच्या नावावर पाच राष्ट्रीयकृत बँका व एका खाजगी बँकेच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन शेतकऱ्यांच्या नावावर सुमारे रुपये ३२८ कोटीचे कर्ज घेतले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणी तक्रार प्राप्त झाली असून त्यानुषंगाने गंगाखेड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २९३/२०१७ भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ अन्वये दिनांक ०५/०७/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे क्रिमीनल रिट याचिका क्र. ८७९/२०१७ दाखल झालेली असून त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७/०६/२०१७ रोजी दिलेल्या निर्देशानुसार विशेष तपास पथकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपी यांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत. तसेच या प्रकरणी पीक कर्ज मंजुर करणारे व पीक कर्जाची प्रक्रिया पूर्ण करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांची चौकशी करणे आहे. गुन्ह्याची व्याप्ती ही मोठ्या प्रमाणावर व व्यापक स्वरूपाची असून सदर गुन्हा तपासावर आहे.

(३) विलंब झाला नाही.

-----------------

## नरडाणा (ता.शिंदखेडा, जि.धुळे) येथील शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(१२) * ३३७४० श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरडाणा (ता.शिंदखेडा, जि.धुळे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी संपादित केलेल्या जमिनीचा आर्थिक मोबदला शेतकऱ्यांना अदयापही मिळाला नसून मागील ७ वर्षापासून इतर लाभांपासून सदर शेतकरी वंचित असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनी संपादित केलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक भरपाई आणि तरुण भूमिपुत्रांना रोजगार देण्याचे आश्वासन देऊन शेकडो एकर जमीन संपादित केली परंतू अद्यापही शासनाने आश्वासनपूर्ती केली नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही,

अतिरिक्त नरडाणा टप्पा क्र. ३ साठी जमीन संपादन करावयाच्या शेतकऱ्यांशी वाटाघाटीने नुकसान भरपाईचे दर ठरविण्यासाठी दिनांक २४/१०/२०१३ व दिनांक ११/३/२०१६ रोजी बैठका घेण्यात आल्या आहेत. सदर बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, धुळे यांनी दर हेक्टरी २० लाख दर जाहीर केला आहे. मात्र सदरचा दर शेतकऱ्यांनी अमान्य केला असल्यामुळे शेतकऱ्यांसोबत पुन:श्च संवाद साधण्यात येत आहे.

(२) व (३) धुळे जिल्हयाच्या आर्थिक विकासासाठी शासनाने नरडाणा औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. १ व २ साठी जमिनी संपादित केल्या आहेत. त्यात रितसर निवाडा करून नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे. तसेच खातेदारांना महामंडळाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे भूखंड परतावा व नोकरीसाठी प्राधान्य प्रमाणपत्र (PRIORITY CERTIFICATE) दिले जाते. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील आदिवासी वसतिगृहांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१३) * ३०९२८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, अ‍ॅड.राहुल नार्वेकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील आदिवासी मुलांच्या व मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी जागा व इमारतीच्या बांधकामाच्या प्रस्तावास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा माजी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री, सचिव, आदिवासी विकास विभाग तसेच व्यवस्थापक प्रशासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे दिनांक ०३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार आदिवासी मुलांच्या व मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी जागा व इमारतीच्या बांधकामाच्या प्रस्तावास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय.
(२) ठाणे येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी ठाणे महानगर पालिका यांच्या ताब्यात असलेली मौजे भाईंदर पाडा येथील लोढा कॉम्पलेक्स मधील सर्व्हे नं. १०७/१/२ अेपी, १०२ पी, १०७/१/१ पी, १०७/१/२ बी पी मधील ३२०० चौ.मी. क्षेत्रफळापैकी २२०० चौ.मी. जमीन ताब्यात घेण्यासाठी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक १३/७/२०१७ च्या पत्रान्वये सादर केलेल्या रुपये २,८३,८०,०००/- किंमतीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बदलापूर (पुर्व) (जि.ठाणे) येथील महावितरण कार्यालयाच्या गैरकारभाराबाबत

**(१४) * ३४५१३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदलापूर (पुर्व) (जि.ठाणे) येथे महावितरणची भरमसाठ बिले आकारणे, मुदत संपल्यानंतर बिले प्राप्त होणे, मीटर रिडींग उशीराने म्हणजे दीड ते दोन महिन्याने घेणे, परिणामी नेहमीपेक्षा बील दुपटीने-तिपटीने येणे अशा गैरप्रकारामुळे ग्राहकांमध्ये असंतोष पसरला असून शासनाने याबाबत तातडीने दखल घेऊन कारवाई करण्याची मागणी तेथील नागरिकांनी माहे मे-जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान उप अभियंता, महावितरण, बदलापूर (पुर्व) यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच नागरिकांना योग्य व नियमित वीज देयके देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) चुकीच्या रिडींगची वीज बीले आकारणी केल्याबाबत ग्राहकांच्या तक्रारी माहे जून, २०१७ च्या दरम्यान महावितरण कंपनीस प्राप्त झाल्या आहेत.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने कंपनीकडून स्थळतपासणी अहवालानुसार मीटर वाचनाप्रमाणे सुधारीत वीज देयके देण्यात आलेली आहेत. चुकीच्या मीटर वाचनाकरिता एजन्सीवर नियमाप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच बदलापूर (पूर्व) येथील रिडींग एजन्सी बदलण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयात संजय गांधी निराधार योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१५) * ३४४२० श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात संजय गांधी निराधार योजनेंतर्गत लाभार्थ्यांना केवळ रुपये ६००/- देण्यात येत असून सदर योजनेच्या कामात गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत शासन निर्णय दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० नुसार पात्र लाभार्थ्यास दरमहा रुपये ६००/- आणि एका कुटुंबात एका पेक्षा जास्त लाभार्थी असल्यास दरमहा रुपये ९००/- इतके अनुदान देण्यात येते. औरंगाबाद जिल्हयात विशेष सहाय्य योजनेच्या लाभार्थ्यांना माहे जून, २०१७ अखेरपर्यंतचे अनुदान वाटप करण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

सदर योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संजय गांधी निराधार योजनेच्या अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याबाबत

**(१६) * ३११२१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महागाईमध्ये दिवसेंदिवस होत असलेल्या वाढीमुळे संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याची मागणी संबंधितांनी शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी निधीची तरतूद करुन उक्त लाभार्थींना वाढीव रक्कम मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे विभाजन करून नवीन बाजार समित्यांची निर्मिती करणेबाबत

**(१७) * ३२०२० डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात विशेषत: त्र्यंबकेश्वर व पेठ तालुक्यातील कृषी उत्पादन क्षेत्रात झालेली वाढ, नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीची व्यापक कार्यमर्यादा, भौगोलिकदृष्टया असलेले विस्तारीत कार्यक्षेत्र, शेतकरी सभासदांची संख्या इ. बाबी विचारात घेता नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे विभाजन करून त्र्यंबकेश्वर, पेठ व इतर तालुक्यात स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समितीची निर्मिती करण्याची आवश्यकता निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्र्यंबकेश्वर, हर्सुल व पेठ येथे बाजार समिती आवार नसतांना खाजगी व्यापारी विविध प्रकारचा शेतमाल मोठ्या प्रमाणावर खरेदी करतात त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती नाशिक येथे शेतमाल पोहचत नसल्याने महसुलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतमालास योग्य बाजारपेठ व विक्री मुल्य मिळून देण्याच्यादृष्टीने त्र्यंबकेश्वर, पेठ व इतर तालुक्यात स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समितीची निर्मिती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे विभाजन करण्याची मागणी केली होती.

(२) अंशत: खरे आहे.

त्र्यंबकेश्वर, हरसुल व पेठ हे आदिवासी क्षेत्र असल्याने तेथे शासनाचे आदिवासी विकास विभागामार्फत अन्नधान्याचे एकाधिकार खरेदी केंद्र सुरू आहे व तेथेच भूसार शेतमाल खरेदी केला जातो.

शासनाने पणन अधिनियमात सुधारणा करुन दिनांक ५ जुलै, २०१६ पासून बाजार समितीच्या आवाराबाहेर फळे व भाजीपाला नियमन मुक्त केला आहे. त्यामुळे शेतकरी त्यांची फळे व भाजीपाला कोठेही विक्री करु शकतो.

(३) नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विभाजनाचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रिलायन्स कंपनीच्या ब्लास्टींगमुळे (जि.रायगड) मालमत्तेचे नुकसान झाल्याबाबत

**(१८) * ३२४७९ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठणे (ता.रोहा) आणि शिहू व बेणसे (ता.पेण, जि.रायगड) परिसरात रिलायन्स कंपनीच्या अनधिकृत ब्लास्टींगमुळे ग्रामस्थांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिलायन्स कंपनीच्या ब्लास्टींगमुळे परिसरातील ग्रामस्थांच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याबाबत संबंधित तलाठी यांनी पंचनामे करून अहवाल संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमांचा भंग करणाऱ्या रिलायन्स कंपनीविरूध्द कार्यवाही करून नुकसानग्रस्त ग्रामस्थांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) हे खरे नाही.

(२) संबंधित तलाठी यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) ग्रामस्थांच्या मालमत्तेचे नुकसान झालेले नसल्याने भरपाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयात खाजगी अपंग संस्थांमध्ये नियमबाह्यरित्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्याबाबत

**(१९) * ३३३२९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील खाजगी अपंग संस्थामध्ये पद भरती करताना समाजकल्याण आयुक्तांची पूर्वसंमती न घेता परस्पर पद मान्यता देऊन नियमबाह्यरित्या नियुक्त्या केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती व कोणत्या संस्थामध्ये कर्मचाऱ्यांच्या नियमबाह्य नियुक्त्या करण्यात आल्या आहेत, त्या कर्मचाऱ्यांचे वेतन मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांनी प्रलंबित ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) होय.

बीड जिल्हयातील १७ अपंगांच्या विशेष शाळांच्या संचालकांनी अपंग कल्याण आयुक्तालयाच्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय ५५ कर्मचाऱ्यांची पद भरती केली असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या निदर्शनास आले. त्यानुसार संबंधित १७ संस्थांमधील ५५ कर्मचाऱ्यांचे वेतन जानेवारी, २०१७ पासून प्रलंबित ठेवण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी जबाबदार संबंधित अधिकारी/कर्मचारी व संस्थाचालक यांना नोटीस बजावून खुलासे मागविण्यात आले आहेत. सदर खुलासे विचारात घेवून पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका दाखल झाल्या असून मा.न्यायालयाने Status quo आदेश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेतकऱ्यांचा सातबारा कोरा नसल्याने बँकांकडून कर्ज उपलब्ध होत नसल्याबाबत

**(२०) * ३११३४ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व बैठकीत राज्यातील मागेल त्या शेतकऱ्याला पीक कर्ज दयावे यासाठी प्रयत्न करावेत असे जिल्हा बँकांना शासनाने आदेश दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक शेतकऱ्यांचा सातबारा कोरा नसल्याने अनेक बँका शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्याबाबत टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासंदर्भात शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी पीक कर्ज उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशतः खरे आहे.

(२) नाही.

(३) खरीप, २०१७ मध्ये दिनांक १५/७/२०१७ पर्यंत एकूण १८,६३,७७४ शेतकऱ्यांना रूपये १२,३५,४६९/- लाखाचे पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे.

सुलभ पीक कर्ज अभियान, २०१७ अंतर्गत दिनांक १५/७/२०१७ पर्यंत १६ जिल्हयात एकूण १७६२ कर्ज मेळावे आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये एकूण ४८१३० शेतकऱ्यांना रूपये ३३,९२८/- लाख कर्ज वाटप करण्यात आले आहे.

तसेच दिनांक १४/६/२०१७ च्या शासन निर्णयानुसार रूपये १०,०००/- च्या मर्यादेपर्यंत एकूण ६९५२ शेतकऱ्यांना रूपये ५७४ लाखाचे तातडीचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील कंपन्यांनी नवोदय अर्बन को-ऑप बँकेची केलेली फसवणूक

**(२१) * ३३२०६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील ग्लॅडस्टन इन्फ्रा, मनमोहन ट्रेडिंग कं. तसेच जोशी कन्सलटन्सी व इतर ३ कंपन्यांच्या समूहांनी कर्ज थकविल्यामुळे तसेच संचालकांच्या चुकीच्या कामकाज पध्दतीमुळे नवोदय अर्बन को-ऑप. बँक अडचणीत आली असल्याचे माहे जून, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेच्या एकूण रुपये ४७ कोटी कर्जापैकी रुपये ४५ कोटींचे कर्ज हे उक्त तीन कंपन्यांच्या समूहांनी थकविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकेची फसवणूक करणाऱ्या या समूहांच्या संचालकांची मालमत्ता जप्त करुन बँकेची देणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर थकित देणी कधीपर्यंत वसूल करण्यात येणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) बँकेचे माहे जून, २०१७ अखेर एकूण रुपये ४७.७१ कोटी इतक्या रक्कमेचे कर्ज थकीत आहे. त्यापैकी रुपये ३९.५४ कोटी इतक्या रक्कमेचे कर्ज विषयाधीन कंपन्यांकडे थकीत आहे.

या थकीत कर्ज वसूलीसाठी बँकेने एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (S.A.R.F.A.E.S.I.) कायदा, २००२ मधील तरतूदीनुसार संबंधित कंपन्यांची मालमत्ता ताब्यात घेतली आहे. जोशी कन्सलटन्सी या कंपनीच्या कर्जप्रकरणी बँकेने न्यायालयात पराक्रम्य अभिलेख अधिनियम (Negotiable Instrument Act) चे कलम १३८ व भा.दं.वि. कलम ४२० अंतर्गत दावा दाखल केला आहे. तसेच आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर यांचेकडे तक्रार नोंदविली आहे. बँकेचे शासकीय लेखापरिक्षकांकडून लेखापरिक्षण सुरु आहे.

सहकार आयुक्त यांनी त्यांच्या दिनांक ९/६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासकाची नेमणूक केली असून बँकेच्या सर्व थकीत कर्जदारांविरुद्ध वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांवर कारवाई करण्याबाबत

**(२२) * ३३९६२ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयात शासकीय भूखंडाचे वाटप करण्यात आलेल्या अनेक गृहनिर्माण संस्थामधील सभासदत्वास जिल्हाधिकारी, ठाणे यांची मान्यता नसताना सन २०१६ मध्ये गृहनिर्माण संस्थाच्या निवडणूका घेण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडधारकांनी चुकीची माहिती देऊन निवडणूका घेतल्या असल्याने या गृहनिर्माण संस्थावर कारवाई करण्याबाबत वारंवार तक्रार करण्यात येऊनही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) व (३) ठाणे जिल्ह्यातील शासकीय भूखंडावरील ९३ गृहनिर्माण सहकारी संस्थापैकी २ संस्थांच्या निवडणूकीसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी अंबरनाथ तालुक्यातील उत्कर्ष गृहनिर्माण संस्था लि. अंबरनाथ या गृहनिर्माण संस्थेच्या निवडणूकीसंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत मतदार यादीमधील बहुतेक सभासद हे शासन मान्य नसल्याचे आढळून आल्याने संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(१) अन्वये कारवाई करण्यात येऊन संस्थेवर प्रशासक नियुक्त करण्यात आला आहे. तसेच मातोश्री रमाबाई आंबेडकर को.ऑप.हौ.सो.

कळवा, जि.ठाणे येथील गृहनिर्माण संस्थेच्या निवडणूकीसंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे यांनी चौकशी केली असता संस्थेच्या वैयक्तिक व्यक्तींनी सभासद बदलीबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे अर्ज केले असून या अर्जाची तहसिलदार ठाणे यांचेस्तरावर चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयात दलित वस्ती सुधार योजनांच्या विकास कामांबाबत

**(२३) * ३४४२५ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयात दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत जिल्हा परिषदेला दरवर्षी कोटयवधी रुपये मिळत असूनही या योजनेत बृहत आराखडयानुसार दलित वस्त्यांचा समावेश केला जात नसल्याने अनेक दलित वस्त्या विकासापासून वंचित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुळ दलित वस्त्यांना डावलून दलितांची नगण्य संख्या असलेल्या वस्त्यांना मुबलक निधी दिला जात असल्याने याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.
(२) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेचा औरंगाबाद जिल्ह्याचा सन २०१३ ते १८ या कालावधीचा बृहत आराखडा मंजूर असून या बृहत आराखड्यात ज्या वस्त्यांचा समावेश आहे त्या वस्त्यांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात निधी वितरीत करुन कामे करण्यात येतात.

तसेच या योजनेचा औरंगाबाद जिल्ह्याचा सन २०१८ ते २०२३ या कालावधीचा नवीन बृहत आराखडा मंजूर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे कृषी टर्मिनल मार्केट उभारण्याबाबत

**(२४) * ३२०२२ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७९८५ ला दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे कृषी टर्मिनल मार्केट उभारण्यासाठी मौजे पिंपरी सय्यद (जि.नाशिक) येथील १०० एकर जमीन कृषी पणन मंडळास उपलब्ध करून देण्यास ग्रामविकास विभाग, नगरविकास विभाग व महसूल विभाग यांनी सहमती दर्शविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर मोठ्या प्रमाणावर उत्खनन होऊन खड्डे पडल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर जागा टर्मिनल मार्केटच्या उभारणीसाठी योग्य आहे किंवा कसे याबाबत पणन, संचालक यांना प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जागेची पणन, संचालक यांनी पाहणी करून सादर केलेल्या अहवालामध्ये काय अभिप्राय देण्यात आलेले आहेत व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, सदर कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) मौजे पिंपरी सैय्यद, ता. जि. नाशिक या ठिकाणी दोन जागा उपलब्ध आहेत. सर्व्हे नं.१६२१ (क्षेत्र ५४.५५ हे.आर.) मध्ये मोठ्या प्रमाणात गौण खनिजाच्या उत्खननामुळे मोठ मोठे खड्डे निर्माण झालेले आहेत. ते बुजविण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागेल. तथापि, सर्व्हे नं.१६५४ (क्षेत्र ५२.५५ हे.आर) या जागेच्या सपाटीकरण कामाचा विचार

केल्यास सर्व्हे १६२१ मधील जागेच्या सपाटीकरण कामापेक्षा तुलनात्मकदृष्टया खर्च कमी राहील असा अहवाल पणन संचालनालयाने शासनास सादर केला आहे.

सदर टर्मिनल मार्केट विकसित करण्याच्यादृष्टीने खाजगी भागीदारीकरिता Business Model तयार करुन शासनास सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळास देण्यात आलेल्या आहेत.

(४) पणन मंडळाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर शासनस्तरावरुन कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामडळ (जि.सांगली) येथे भूखंडधारकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२५) * ३२९५४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळांतर्गत भूखंड वितरीत करण्यात आले असले तरी सदर भूखंडधारकांना मुलभूत सुविधा उपलब्ध न केल्यामुळे भूखंडधारक स्वखर्चाने सुविधा उपलब्ध करून प्रकल्प सुरू करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुविधा उपलब्ध नसल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने वितरीत केलेले भूखंडमालक बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेवून सदर भूखंड विक्री करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वखर्चाने भूखंडधारक सुविधा उपलब्ध करून प्रकल्प उभारणीचा प्रयत्न करणाऱ्या भूखंडधारकांविरूद्ध महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ दंडात्मक आकारणी करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्वखर्चाने प्रकल्प उभारणी करुन सुविधा उपलब्ध करणाऱ्या भूखंडधारकांकडून दंड आकारणी वसुल न करता त्यांना सोईसुविधा उपलब्ध होणे व भूखंड विक्री करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

सांगली जिल्हयातील विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये पायाभूत सुविधा अंतर्गत डांबरी रस्ते, पाणीपुरवठा, दिवाबत्ती व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच शिराळा औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी १६२.८० हे.आर जमीन संपादित करण्यात आली असून भूखंड धारकांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी मोरणा धरण येथे जॅकवेल बांधलेले आहे. तसेच ३.०० द.ल.लि./ दिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र व अशुध्द पाणीपुरवठा जलवाहिनी टाकणेत आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

औद्योगिक क्षेत्रासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

शिराळा औद्योगिक क्षेत्रामधील "सी" व "ई" विभागामधील ज्या भूखंडाचा विकास कालावधी सप्टेंबर-२०१७ पूर्वी संपुष्टात येत आहे. अशा भूखंडांना सप्टेंबर, २०१८ पर्यंत विनाशुल्क मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयातील गटसचिवांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम उपनिबंधक यांच्याकडे प्रलंबित असल्याबाबत

**(२६) * ३३३४१ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील गट सचिवांची रुपये १ कोटी २७ लाख इतकी भविष्य निर्वाह निधीची रक्कम (जीपीएफ) प्रलंबित असल्याने भविष्य निर्वाह निधी उप आयुक्त, औरंगाबाद यांनी जिल्हा उपनिबंधक यांना समन्स बजावले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी जिल्हा उप निबंधक यांना रुपये २२ लाख दंड करण्यात आला असून सदर दंडाची रक्कम कोणी अदा केली आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील बांबू टिंबर युनिट प्रकल्पास विलंब होत असल्याबाबत

**(२७) * ३१२७३ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींना रोजगार मिळवून देणारा बांबू टिंबर युनिट प्रकल्पास होत असलेल्या विलंबामुळे सात कोटीचा निधी मागील ३ वर्षापासून खर्च करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रलंबित बांबु प्रकल्प सुरु करण्यासाठी व उक्त भागातील आदिवासींना रोजगार मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे अंशतः खरे आहे.

गडचिरोली येथील बांबू प्रक्रीया युनिट करीता राज्य निधीतून रुपये ८०९.४० लक्ष निधीतून वितरीत करण्यात आले होते. यापैकी रुपये ५९८.९५ लक्ष निधी अंमबलजावणी करणाऱ्या संस्थेस वितरीत केला आहे. उर्वरीत रुपये २१०.९० लक्ष व विशेष केंद्रीय सहाय्य योजनेंतर्गत प्राप्त रुपये १०३४.०० लक्ष निधी अखर्चित आहे.

(२) गडचिरोली बांबू प्रक्रीया युनिटच्या उभारणीसाठी अंमलबजावणी करणाऱ्या गडचिरोली बांबू सहकारी संस्थेस वितरीत करण्यात आलेल्या रुपये ५९८.९५ लक्ष निधीच्या खर्चाबाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प, गडचिरोली यांनी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालामध्ये योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने त्रुटी उपस्थित केल्या आहेत. सबब, या अहवालाच्या अनुषंगाने अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे कळविले आहे. या योजनेव्यतिरिक्त आदिवासी विकास विभागाच्या विविध राज्य व केंद्रीय योजनांतर्गत आदिवासींना रोजगार उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक व अहमदनगर विभागातील अविकसित भुखंड ताब्यात घेण्याबाबत

**(२८) * ३२०२३ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक व अहमदनगर विभागातील उद्योगांसाठी देण्यात आलेले भुखंड अनेक वर्षांपासून अविकसित व विनावापर पडून असल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु केली असल्याचे दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी यांनी नाशिक व अहमदनगर मधील ३२१ अविकसित भूखंडधारकांना नोटीसा देण्याची कार्यवाही करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भूखंड ताब्यात घेऊन मेक इन नाशिकच्या पार्श्वभुमीवर नवीन उद्योजकांना उद्योगांसाठी उपलब्ध करून देणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

विहीत कालावधीत भूखंड विकसित न केल्यास असे भूखंड ताब्यात घेण्याची कारवाई करण्यात येते. ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.

(२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत उद्योग संजिवनी-२०१५ ही योजना राबविण्यात आली. सदर योजनेंतर्गत प्रादेशिक अधिकारी, नाशिक अंतर्गत नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील एकूण ३२० भूखंडधारकांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत व महामंडळाच्या धोरणानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) ३२० भूखंडापैकी २२ भूखंड महामंडळाच्या ताब्यात आलेले आहेत. सदरहू ताब्यात घेतलेल्या भूखंडाचे वाटप महामंडळाच्या धोरणाप्रमाणे करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.